**प्रेस नोट** **दिनांक १२/११/२०२१**

| | | |
|---|---|---|
| १ | ला.प्र.वि.कार्यालय | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई. |
| २ | गु.र.क्र | ४६/२०२१ |
| ३ | कलम | कलम ७ भ.प्र.अधि. १९८८ सह कलम २०१ भा.द.वि. |
| ४ | आरोपीचे नांव कार्यालयाचा पत्ता | १) लोकसेवक श्री.रविंद्र रामहरी भोसले, वय ३९ वर्षे, पद– पो.ना.क्र.०५०१५७ कांदिवली पोलीस ठाणे, मुंबई<br>२) लोकसेवक श्री अविनाश तानाजी पवार, वय ३७ वर्षे पद– सहायक पोलीस निरीक्षक, कांदिवली पोलीस ठाणे, मुंबई |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये ३५,०००/– |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ३५,,०००/– |
| ७ | हस्तगत लाचेची रक्कम | रुपये २५,०००/– |
| ८ | थोडक्यात हकीगत | फिर्यादी यांचे ज्वेलर्सचे दुकान, काजूपाडा, कांदिवली पुर्व मुंबई या ठिकाणी असून त्याचे परिचयाचे कारागीर यांनी फिर्यादी यांना चोरीचे ९० ग्रॅम सोने विक्री केले असून ते कांदिवली पोलीस ठाणे गुन्हयातील असून लोकसेवक आरोपी क्र.१ नामे रविंद्र भोसले, पो.ना.क्र.०५०१५७ व लोकसेवक आरोपी क्र.२ अविनाश तानाजी पवार, सहायक पोलीस निरीक्षक यांनी ते कांदिवली पोलीस ठाणे गुन्हयात हस्तगत करण्याकरीता प्रथम फिर्यादीकडे रु.७५,०००/– ची मागणी केली. आरोपीताने फिर्यादीकडून प्रथम रु.४०,०००/–स्विकारले. आरोपीताने उर्वरीत रक्कम रु. ३५,०००/– देण्याकरीता तगादा लावला. फिर्यादी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १०/११/२०२१ रोजी या कार्यालयात प्रत्यक्ष येवून लेखी तक्रार दिली.<br>आरोपीतांनी यांनी फिर्यादीचे दुकानात येवून त्यांना उर्वरीत रक्कम रु. ३५,०००/– देण्याबाबत तगादा लावला. त्यानुसार फिर्यादीस दि.१०/११/२०२१, दि. ११/११/२०२१ व दि.१२/११/२०२१ रोजी तक्रारीची पडताळणी करण्यात आली असता आरोपीताने फिर्यादीस उर्वरीत रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यानुसार दिनांक १२/११/२०२१ रोजी फिर्यादी यांना आरोपीताचे कार्यालय कांदिवली पोलीस ठाणे येथे भेट घेण्यास पाठवून पडताळणी केली असता आरोपी क्र.१ व २ यांनी फिर्यादीकडे रू.३५,०००/– इतक्या रक्कमेंच्या लाचेची मागणी केली असल्याचे स्पष्ट झाले. त्यावरून करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आरोपी क्र.१ यांनी फिर्यादी यांचेकडून लाचेची रक्कम रू.३५,०००/–स्विकारून पोलीस ठाणेतून मोटार सायकलवरुन पळून गेले. व लाचेच्या रक्कमेतील नोटांची फेरपालट करुन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. म्हणून भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलम ७ सह कलम २०१ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

<u>संपर्क</u>: लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१,सर पोचखानवाला मार्ग, वरळी,मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२–२४९२१२१२,
फॅक्स क्र. ०२२–२४९२२६१८,
वेबसाईट : acbmaharashtra.gov.in,
ईमेल : acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल : addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक : www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईल ॲप : www.acbmaharashtra.net.

( संजू जॉन )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई